**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अनंत रामराव मुळवाड
११७, गोल्ड फिंच पेठ, चौपाड,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी,**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४४/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७/३/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७/६/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १/७/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>श्री. नागनाथ शंकर सुरवसे यांच्या चौपाड येथील मालकीच्या घर नं.११६ या जागेच्या बांधकाम परवाना व मंजूर नकाशाची नक्कल | |

## विवेचन

दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा' मध्ये सदर अपिलाचा समावेश होता. त्यास अपीलकर्ता हे अनुपस्थित होते.

अपीलकर्त्याच्या माहिती - मागणी अर्जास विहित वेळेत उत्तर देण्यात आलेले आहे. तथापि त्यांची मूळ मागणी ही नकाशाची नक्कल प्रत तयार करुन मिळावी अशी होती, सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि नकाशाची प्रत तयार करुन देण्यास विलंब करणा-या अनुरेखकावर कारवाई करण्यात येत आहे, असे सोलापूर महानगरपालिका जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता सोलापूर, व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी, सोलापूर महानगरपालिका यांनी 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रामध्ये नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांसह सदर बाब विचारात घेता आयोगाचे आदे पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे. 31 MAR 2010
दि :-

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रमेश बापूराव पाटील
मु.पो.श्रीपूर, (पिवळी चाळ),
ता.माळशिरस, जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
जिल्हा परिषद सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे
कनिष्ठ महाविद्यालय श्रीपूर,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५२/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/११/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/०१/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शैक्षणिक वर्ष २०००-२००१ मध्ये प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असलेल्या दोन अर्धवेळ शिक्षकांपैकी एकच अर्धवेळ शिक्षकाचे पद का रद्द करण्यात आले या बाबतचा खुलासा | |

## विवेचन

दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. श्री. पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांच्या कडे अर्ज केला होता. माहिती प्रशालेच्या स्तरावरील असल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी अर्ज मुख्याध्यापकांकडे वर्ग केला.

अपीलकर्ता श्री. रमेश बापूराव पाटील यांना आवश्यक असणारी माहिती समक्ष दिलेली असून प्रशालेनेदेखील सदरची माहिती त्यांना दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय आणि अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी सदर कार्यक्रमातील प्रपत्रात नमूद केले आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिनांक १२/१२/२००८ च्या पत्रान्वये देखील तसे कळविले आले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ.
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रमेश बापूराव पाटील
मु.पो.श्रीपूर, पिंवळी चाळ,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
जिल्हा परिषद सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.),**
जिल्हा परिषद सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०/३/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/५/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर मधील शैक्षणिक वर्ष १९९९ ते २००७ पर्यंतच्या शिक्षक सेवक संच निश्चिती व कार्यभार तक्त्याच्या सत्यप्रती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९/११/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमातील प्रपत्रासोबत जोडलेल्या निवेदनामध्ये मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर यांनी अपीलकर्ता श्री. रमेश बापूराव पाटील यांना प्रशालेकडील दिनांक २/१२/२००६, २७/९/२००७, २३/१०/२००७ व २४/१२/२००७ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती दिलेली असल्याचे सदर पत्रांच्या प्रतींसह नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधियिम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. बसवराज भिमराव कोळी
४३-१/२, भवानी पेठ, मराठा वस्ती,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष**
शिवगंगा नवरात्र महोत्सव मंडळ (ट्रस्ट),
४३-१/२, भवानी पेठ, मराठा वस्ती,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५६सोलापूर +११५७सोलापूर +११५८ सोलापूर |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १/९/२००८ |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## <u>विवेचन</u>

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. बसवराज भिमराव कोळी यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही.

त्यामुळे सदरची अपिले दखलयोग्य ठरत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे दि.१/९/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भिमराव मारुती येवले, ..... **अपीलकर्ता**
मु.पो.त्रिमली, ता.खटाव, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक भूमी अभिलेख, ..... **उत्तरवादी**
तहसील कंपाऊंड, पोवई नाका,
सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, वडूज,
खटाव , जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८७/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. भिमराव मारुती येवले,<br>मु.पो.त्रिमली, ता.खटाव, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक भूमी अभिलेख,<br>तहसील कंपाऊंड, पोवई नाका, सातारा तर्फे प्रतिनिधी<br>श्री. एस. के. जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख कार्यालय, वडूज, खटाव , जि.सातारा श्रीमती स्मिता रा. गौड | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.७.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि २८.७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.८.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, खटाव, जि. सातारा यांनी जमीन एकत्रिकरणासंबंधातील जाब-जबाबाच्या प्रती अभिलेख गहाळ झाल्याच्या कारणावरून नाकारल्या. दहा दिवसांत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी, तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांनी देऊनही आपल्याला हव्या असलेल्या नकला मिळाल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भिमराव मारूती येवले यांनी केली.

श्री. येवले यांनी मागितलेली माहिती सन १९६८ मधील आहे. हे अभिलेख उपलब्ध होत नसल्याचे विहित मुदतीत व वेळोवेळी त्यांना कळविले आहे. हे कागदपत्र कायम स्वरूपी जतनाचे असले तरी भूमि अभिलेख कार्यालय तीन-चार वेळा स्थलांतरित झाल्यामुळे त्या संपूर्ण गावाचे अभिलेख उपलब्ध होत नाहीत. याबाबत कसून शोध घेण्यात आला. संबंधित दप्तरबंद यांचे जाबजबाब घेण्यात आले. तसेच मूळ प्रकरणाच्या अनुषंगाने पूरक माहितीही श्री. येवले यांना देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, खटाव श्रीमती स्मिता रा. गौड यांनी पूरक कागदपत्रांसह केले. श्री. येवले यांनी मागणी केलेले अभिलेख कायम स्वरूपी जतनाचे असले तरी ४२ वर्षांपूर्वीचे आहेत. तत्कालीन कर्मचाऱ्यांचा तपशील आता स्पष्ट होणे अवघड आहे, असेही श्रीमती गौड यांनी नमूद केले.

वरील बाबी लक्षा घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जमीन विषयक नोंदीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेले कायम स्वरूपी जतनाचे अभिलेख उपलब्ध न होणे नियमबाह्य आहे. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांनी स्वतंत्र पथकाद्वारे संबंधित अभिलेखाची सखोल तपासणी करून दि. ३०.४.२०१० पर्यंत आयोगास याबाबतचा अहवाल सादर करावा.

पुणे
दि. ३१ .३.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. हणमंत राजाराम पवार
मु.पो.अमृतवाडी, पो.पाचवड,
ता.वाई, जि.सातारा
**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर जिल्हाधिकारी, सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
१) तहसीलदार वाई, ता.वाई, जि.सातारा
२) उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९३/२००९/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. हणमंत राजाराम पवार<br>मु.पो.अमृतवाडी, पो.पाचवड, ता.वाई, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर जिल्हाधिकारी, सातारा श्री. व्ही. एन. देशमाने<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** १) तहसीलदार वाई, ता.वाई, जि.सातारा<br>सौ. वैशाली चव्हाण<br>२) उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा<br>श्री. कुमार खैरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.७.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

वहिवाट प्रकरणी दि. २०.१२.१९८१ रोजी झालेल्या आदेशाची व जाबजबाबाच्या नकलांची मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वाई यांच्याकडे केली होती. परंतु ही माहिती अद्याप मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. हणमंत राजाराम पवार यांनी केली.

संबंधित प्रकरणाच्या आदेशाची कागदपत्रे तालुक्याच्या अथवा तलाठ्याच्या दप्तरामध्ये आढळ होत नाहीत, तसेच या कागदपत्राबाबतच्या नोंदीही दप्तरी आढळत नाहीत. त्यामुळे अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे नकला देता आलेल्या नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांच्या आदेशानुसार पथक नेमून या कागदपत्रांचा शोध घेण्यात आला. तथापि संदर्भित आदेश उपलब्ध झाला नाही. मात्र त्या आदेशांच्या संबंधित अन्य आदेशाशी प्रती उपलब्ध झाल्या, त्या श्री. पवार यांना देण्यात आल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वाई सौ. वैशाली चव्हाण व अपिलीय प्राधिकार्‍ तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री. व्ही. एन. देशमाने यांनी केले.

संबंधित कागदपत्रे सन १९८१ मधील असून कायम स्वरूपी जतनाची आहेत, असे अभिलेख उपलब्ध न होणे नियमबाह्य आहे. संबंधित सर्व कार्यालयांच्या अभिलेखात त्यांचा शोध घेतला गेला पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तहसीलदार, वाई व उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई या कार्यालयासह सर्व संबंधित कार्यालयांमध्ये उपरोक्त अभिलेखांचा शोध घेऊन, तसेच या अभिलेखाच्या जतनाची जबाबदारी अस..ऱ्या तत्कालीन कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवून अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी दि. ३०.४.२०१० पर्यंत आयोगास अहवाल सादर करावा.

पुणे
दि. ३१.३.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हनुमंत वासुदेव खरात
चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, बार्शी,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
जिल्हा परिषद बांधकाम विभाग,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/०६/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०८/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३/१०/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पंचायतराज समिती व लेखापरीक्षणास दफ्तर उपलब्ध करुन न देणा-या शाखा अभियंता व कनिष्ठ शाखा अभियंता यांची माहिती व त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.३/०१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमां' मध्ये सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. हनुमंत वासुदेव खरात अनुपस्थित होते. अपिलकर्त्यास विविध कार्यालयांकडून संकलित करुन सर्व माहिती दिलेली आहे, संकलित करुन देण्यामुळे विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सोलापूर, यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.लक्ष्मण सुखदेव ताड
मु.एकलासपूर, पो.अनवली,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती पंढरपूर,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
पंचायत समिती पंढरपूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२११/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/०६/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/०८/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या पंढरपूर तालुक्यातील सर्व गावांमध्ये करण्यात आलेल्या अंमलबजावणी संदर्भातील संपूर्ण पत्रव्यवहारांच्या छायाप्रती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.३/०१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता हे गैरहजर होते. सदर कार्यक्रमातील प्रपत्रासोबत अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती पंढरपूर, यांनी दि.२२/०८/२००८ रोजी दिलेला निर्णय सादर केला. सदरचा निणर्य योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य, यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

प्रा. दत्तात्रय देवराम पवार
दिल्ली नाका, कोल्हेवाडी रोड,
पवार मळा, संगमनेर, जि.अहमदनगर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक,
उच्च शिक्षण, पुणे विभाग,
शिक्षण सहसंचालक कार्यालय,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण, पुणे विभाग,
शिक्षण सहसंचालक कार्यालय, पुणे
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** प्रा. दत्तात्रय देवराम पवार
दिल्ली नाका, कोल्हेवाडी रोड,
पवार मळा, संगमनेर, जि.अहमदनगर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक,
उच्च शिक्षण, पुणे विभाग, शिक्षण सहसंचालक कार्यालय,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१ डॉ. एन. एम. कडू

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण, पुणे विभाग, शिक्षण सहसंचालक कार्यालय, पुणे
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१ श्री. अ.नि. सोरटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. २४.२.२०१० रोजी आयोगापुढे सुनावणी घेण्यात आली.

अनुदानाच्या दृष्टीने संगमनेर येथील स.म.भा. सं. थोरात महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या, तुकडी इ. बाबींची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांच्याकडे मागितली होती. ती समाधानकारक मिळाली नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त माहिती देण्यासाठी मुदतवाढ मागूनही माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांनी सुनावणीचा लेखी निर्णय दिला नाही. उप संचालक, उच्च शिक्षण कार्यालय, शिक्षण संचालक कार्यालय, मंत्रालय आदी पातळ्यांवर अर्ज करूनही अनुदानाबाबतच्या निकषांची माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता प्रा. दत्ताराम देवराम पवार यांनी केली.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती शिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या कक्षेतील असल्यामुळे अर्ज आपल्याकडे वर्ग झाला होता. त्यानुसार अपीलकर्त्यास विहित मुदतीत व पूर्ण माहिती, त्याबाबतच्या शासन निर्णयासह देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण, पुणे विभाग श्री. अ. नि. सोरटे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

प्रा. पवार यांच्या अपिलाची सुनावणी आपल्यासमोर होऊन लेखी अहवाल देण्यात आला असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग डॉ. एन. एम. कडू यांनी संबंधित अहवालाच्या प्रतीसह नमूद केले.

अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती देण्यात आली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. तथापि अपीलकर्त्यास संदिग्ध वाटणाऱ्या माहितीबाबतचा तपशील अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांनी अपीलकर्त्यास द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने दिले. त्यानुसार कार्यवाही केल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग डॉ. एन. एम. कडू यांनी आयोगाला सादर केला. परंतु 'दिलेली माहिती अपूर्ण, विसंगत व संभ्रम निर्माण करणारी आहे,' अशी तक्रार प्रा. पवार यांनी दि. ४.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांनी दिलेली माहिती पाहता ही तक्रार रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुहास रेवणसिध्द भोसगे
५६, धर्मराज नगर, एस.के.बिराजदार शाळेजवळ,
शेळगी, सोलापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
एस.ई.एस.तंत्रनिकेतन,
सम्राट चौक, बुधवार पेठ,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी,**
एस.ई.एस.तंत्रनिकेतन,
सम्राट चौक, बुधवार पेठ,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/१०/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००८ - ०९ या शैक्षणिक वर्षासाठी यंत्र अभियांत्रिकी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी व त्यांच्या गुणपत्रकाच्या छायप्रती | |

## विवेचन

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत

कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. एस.ई.एस.तंत्रनिकेतन, या संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसल्याची बाब अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, एस.ई.एस.तंत्रनिकेतन यांनी प्रपत्रात नमूद केली आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 3 1 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सत्यविजय नाभीराज मोहोळकर
"संघर्ष", २६१७, उमदे गल्ली, पंढरपूर,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पंढरपूर, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०/०७/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०/०८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** रवियोग ट्रेडर्स या विद्युत ठेकेदारी फर्मने पंढरपूर विभागात सन २००१ ते जुलै २००८ अखेरपर्यंत केलेल्या कामांची व रक्कमेच्या तपशिलाची माहिती, तसेच विद्युत वितरण कंपनीतील कनिष्ठ अभियंता श्री. रवि भुतडा यांचे सदर फर्मशी असलेल्या संबधाबाबतची माहिती आणि श्री. भुतडा यांचा सेवा तपशिल | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. सत्यविजय नाभीराज मोहोळकर यांना त्यांच्या मागणीप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती दि. ५/०८/२००८ रोजीच्या पत्रान्वये विहित मुदतीत देण्यात आली आहे. अपीलकर्त्याने प्रथम अपील हे चूकीच्या अधिका-याकडे केले असताना देखील त्यावर कार्यवाही करण्यात आली तसेच मुद्दा क्र.६२ व ६३ बाबत किरकोळ चूकदेखील दुरुस्त केली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पंढरपूर यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हर्षराज जनार्दन शिंदे
५९, भवानी पेठ, मुकुंदनगर,
सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी,**
एस.ई.एस. तंत्रनिकेतन,
सम्राट चौक, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी,**
एस.ई.एस तंत्रनिकेतन,
सम्राट चौक, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३२/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/०८/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५/१०/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/१०/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** एस.ई.एस. तंत्रनिकेतन, सोलापूर मधील २००८ - ०९ या सालातील प्रवेश प्रक्रियेची माहिती | |

विवेचन

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रणजिसिंह विश्वासराव दुधे
मु.पो.कडेगांव, ता.वाई, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वाई, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३३+१२३४ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रणजिसिंह विश्वासराव दुधे
मु.पो.कडेगांव, ता.वाई, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, वाई, जि.सातारा श्री.व्ही.एम.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, वाई, जि.सातारा श्री.एन.बी.जाधव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.४.२००९ व २४.२.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.४.२००९ व १६.३.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.५.२००९ व ३०.३.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.५.२००९ व २९.४.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविल्याप्रमाणे शुल्क भरावयास गेलो असता सहा. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, पंचायत समिती, वाई, जि.सातारा श्री.एस.डी.जमदाडे यांनी चलन दिले नाही, म्हणून अपील केले. निःशुल्क माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई, जि.सातारा यांनी दिला. तरीही माहिती मिळाली नाही. १५६ रूपये शुल्क भरूनही माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रणजीतसिंह विनायकराव दुधे यांनी केले.

शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले होते. सहा. जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क भरून घेतले नाही, याची आपल्याला कल्पना नव्हती. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर माहिती तयार असल्याचे कळवूनही अपीलकर्ता माहिती नेण्यासाठी आले नाहीत. माहिती तयार आहे, असे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वाई, जि.सातारा श्री.एन.बी.जाधव यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत योग्य कार्यवाही केली असल्याचे उभय बाजूंच्या निवेदनावरून व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून दिसते. तथापि अपीलकर्त्यास प्रत्यक्ष माहिती मिळाली नसल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई, जि.सातारा यांच्या निर्णयानुसार माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्याप्रमाणे माहिती देण्यात आल्याचे अपीलकर्त्याची पोच असलेल्या

प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वाई, जि.सातारा श्री.एन.बी.जाधव यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.३.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय दशरथ कांबळे ..... **अपीलकर्ता**
मु.पो.बावधन, ता.वाई, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, ..... **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३५/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. विजय दशरथ कांबळे<br>मु.पो.बावधन, ता.वाई, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा श्रीमती अपुर्वा वानखेडे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा**<br>सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा श्री. टी. सी. मेमाणे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.७.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

खुल्या केरोसिन विक्री परवान्याच्या नूतनीकरणाबाबतच्या आपल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. विजय दशरथ कांबळे यंनी केली.

श्री. कांबळे यांनी केलेल्या मूळ अर्जावरील निर्णयाची माहिती देण्यात आली होती, अशा प्रकारचे परवाने देणे बंद झालेले आहे. मात्र श्री. कांबळे यांनी केलेले अपील आपल्याला प्राप्त झालेले नाही, त्यामुळे त्याबाबतचा निर्णय घेता आला नाही. आयोगाकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर अपिलाबाबत कळविले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, सातारा श्रीमती अपूर्वा वानखेडे यांनी केले.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जावरील कार्यवाहीबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करणारे पत्र अपीलकर्त्यास सुनावणीच्या दिवशीच देण्याचे मौखिक आदेश आयोगाने दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, सातारा श्रीमती अपूर्वा वानखेडे यांनी दि. ६.२.२०१० रोजी अपीलकर्त्यास पत्र समक्ष दिले. अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याची पोहच असलेल्या स्वाक्षरीसह त्यांनी त्याची प्रत आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१ .३.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दादासो विठोबा बुरंगे
मु.बुरंगेवाडी, पो.जवळे,
ता.सांगोला, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती सांगोला, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत बुरंगेवाडी, मु.बुरंगेवाडी,
पो.जवळे, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०६/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/०८/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) सन २००३-०४ ते सन २००७-०८ या कालावधीतील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, बारावा वित्त आयोग, ग्रामनिधी इ. च्या जमखर्चाच्या किर्द वहीची छायाप्रत<br>२) वरिल कालावधीत करण्यात आलेल्या कामांचे मुल्याकंन व मागासवर्गीय लोकांना वाटप केलेल्या साहित्याची देयके व लाभार्थ्यांची यादी<br>३) दि.१/०४/२००५ ते ३०/०७/२००६ अखेर अपीलकर्त्यास दिलेल्या वेतनाचे व्हौचर्स | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. दादासो विठोबा बुरंगे  हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीपैकी कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती विहित मुदतीत दिलेली आहे, तर उर्वरित माहिती बांधकाम विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर नि:शुल्क दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बुरंगेवाडी, मु.बुरंगेवाडी, व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, (पंचायत समिती) सांगोला, जि.सोलापूर यांनी प्रपत्रात  नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.